वाचले क्र.

१) आदेश क्रमांक सुवि/३/कावि/११६/२०२२ दिनांक २८/०२/२०२२
२) सनदी लेखापाल स्वरुप चिंगळे यांचे दिनांक १७/१२/२०१९ रोजीचे जी.एस.टी.सवलतीबाबत पत्र...
३) मा. आयुक्त सो यांचेकडील दिनांक २३/०२/२०२३ रोजीचा मान्य प्रस्ताव.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.१२६४ दि.२८/०२/२०२३ अन्वये खर्चास मान्यता
५) मे.नॅशनल सिक्युरिटी सर्व्हीसेस व मे.सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांचे सोबत दिनांक २८/०२/२०२३ रोजीचा करारनामा.
६) आदेश क्र प्रशा/२/कावि/८०९/२०२२ दिनांक १३/१०/२०२२
७) मुख्य सुरक्षा अधिकारी यांचेकडील दिनांक ०१/०३/२०२३ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे-१८ ,सुरक्षा विभाग
क्र. सुवि/३/कावि/११८ /२०२३
दिनांकः- ०१/०३/२०२३

विषय :- नि.नो.क्र.१/२०२०-२१ अन्वये मनपाचे हद्दीतील विविध (सिग्नल असलेले व सिग्नल नसलेले) व जास्त वर्दळीचे चौक येथील वहातूक व्यवस्थेकामी ठेकेदारी पद्धतीने ट्रॅफिक पोलिसांचे मदतीकरीता १७५ "ट्रॅफिक वार्डन" नियुक्त बाबत.

आदेश,

पिंपरी चिंचवड मनपाचे हद्दीतील विविध (सिग्नल असलेले व सिग्नल नसलेले) व जास्त वर्दळीचे चौक येथील वहातूक व्यवस्थेकामी ठेकेदारी पद्धतीने ट्रॅफिक पोलिसांचे मदतीकरीता "ट्रॅफिक वार्डन" नियुक्त करणेकरीता वाचले क्र. १ अन्वये ई निविदा नोटीस क्र.१/२०२०-२०२१ नुसार कामकाज आदेश देणेत आलेले आहे. वाचले क्र २ अन्वये सदर कामकाजास जी.एस.टी लागु नाही. सदर निविदा कामकाजास मे.नॅशनल सिक्युरिटी सर्व्हीसेस यांचेकडील ८८ "ट्रॅफिक वार्डन" तसेच मे.सैनिक इंटेलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि यांचेकडील ८७ "ट्रॅफिक वार्डन" कर्मचारी असे एकुण १७५ "ट्रॅफिक वार्डन" कर्मचा-यांची नेमणुक करणेकामी वाचले क्र ३ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. तसेच वाचले क्र ४ नुसार निविदेतील अटी-शर्तीचे अधिन राहुन कामकाजास व प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत आलेली आहे.

वाचले क्र.५ अन्वये दोन्ही संस्थेंसोबत दिनांक २८/०२/२०२३ रोजी करारनामा करणेत आलेला आहे. त्यानुसार सदर संस्थांचा कामकाज कालावधी दिनांक ०१/०३/२०२३ ते दिनांक २८/०२/२०२४ असा आहे. मे. नॅशनल सिक्युरिटी सर्व्हीसेस व मे.सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांचेमार्फत खालील तक्त्यात दर्शविलेल्या कालावधीसाठी कर्मचारी घेणेत येत आहे.

| अ.क्र | संस्था/एजन्सी/ठेकेदार/ नाव | "ट्रॅफिक वार्डन" | प्रति कर्मचारी प्रति माह एकूण वेतन | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | मे. नॅशनल सिक्युरिटी सर्व्हीसेस | ८८ | २४,७१५/- | दिनांक ०१/०३/२०२३ ते दिनांक २८/०२/२०२४ |
| २ | मे.सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरिटी प्रा.लि. | ८७ | २४,७१५/- | दिनांक ०१/०३/२०२३ ते दिनांक २८/०२/२०२४ |

मे.नॅशनल सिक्युरिटी सर्व्हीसेस व मे.सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांना तक्त्यात नमुद केलेनुसार कर्मचारी पुरवून "ट्रॅफिक वार्डन" कर्मचारी यांना माहे जानेवारी व जुलै मध्ये होणा-या (महागाई भत्ता/ विशेष भत्ता) वाढीस कामगार कल्याण विभागाने कळविलेस प्रत्यक्ष त्या तारखेपासून दर वाढ लागू करणेस तसेच "ट्रॅफिक वार्डन" कर्मचारी गैरहजर असल्यास त्यांचे मासिक वेतनास महिन्याचे २६ दिवसांनी भागून येणा-या प्रति दिन दराने गैरहजर दिवसांचे वेतन कपात करणेत येईल. तसेच "ट्रॅफिक वार्डन" गैरहजर अथवा बेशिस्त वर्तणूक करताना आढळल्यास त्या दिवसाचे वेतन कपात केले जाईल. निविदाधारकाने नियुक्त केलेला "ट्रॅफिक वार्डन" कर्मचारी कामास सक्षम नसलेला आढळून आलेस त्याचा मेहनताना म.न.पा अदा करणार नाही त्याची पगार

अदायगीची जबाबदारी ठेकेदाराची राहील. गैरहजर "ट्रॅफिक वार्डन" कर्मचा-यांचे एकूण वेतनावर १०% अतिरिक्त दंड अकारणेत येईल. नेमणूकीच्या ठिकाणी झोपलेला "ट्रॅफिक वार्डन" आढळल्यास प्रति "ट्रॅफिक वार्डन" प्रतिदिनी र.रु.२००/- दंड व "ट्रॅफिक वार्डन" कर्मचा-यांने पुर्ण गणवेश परिधान न केल्यास प्रति दिन र.रु.१००/- दंड आकारण्यात येईल व गैरहजरीचे प्रमाण कमी व्हावे म्हणून एक किंवा एका पेक्षा जास्त "ट्रॅफिक वार्डन" गैरहजर असलेस दर प्रति महा अतिरिक्त दंड र.रु.५०००/- कपात करणेची कारवाई करणेस वाचले क्र. ५ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे.

सबब मी उप आयुक्त (सुरक्षा) पिंपरी चिचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे- ४११०१८ वाचले क्र. ६ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अधिन राहून उपरोक्त संस्था/एजन्सी/ठेकेदार यांना त्यांचे नावापुढे नमुद केलेप्रमाणे "ट्रॅफिक वार्डन" कर्मचारी संख्या, करारनाम्यातील मान्य केलेल्या दराने वेतन अदा करण्यास तसेच आकारावयाचे दंड, अतिरिक्त दंड रक्कमेप्रमाणे दंड रक्कम वसुल करणेस, "ट्रॅफिक वार्डन" कर्मचारी पुरविणे करीता करारनाम्यातील अटी-शर्तीनुसार या आदेशात नमुद केलेल्या कालावधीपर्यंत वेळोवेळी लागू होणा-या महागाई भत्ता व इतर भत्यानुसार होणा-या खर्चास या आदेशान्वये मान्यता देत आहे. त्याचप्रमाणे रखवालदारांचे "मदतनीस" वाढ किंवा घट झाल्यास त्याप्रमाणे कामकाज करण्यास संबंधीत संस्थेस बंधनकारक असेल व लेखापरिक्षणामध्ये काही आक्षेप निघाल्यास आक्षेप पूर्तता करणेची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची राहील. सदर आक्षेपाची पूर्तता झालेनंतर महापालिकेकडे जमा केलेली अनामत रक्कम परत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(उदय जरांडे)
मुख्य सुरक्षा अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८,

प्रतिः- १) मे. नॅशनल सिक्युरिटी सर्व्हीसेस
२) मे.मैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरिटी प्रा.लि.